# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL SINCE 1969 — 1969 to 2029

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVIII YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2026 FEBRUARY No. 01

### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

**स्तोत्रसंहिता ३४:१५-२२**

१५. यहोवाचे डोळे न्यायींच्याकडे असतात, व त्याचे कान त्यांच्या हाकेकडे असतात.

१६. यहोवाचे मुख वाईट करणाऱ्यांच्या विरुद्ध आहे, यासाठी की त्यांचे स्मरण पृथ्वीतून छेदून टाकावे.

१७. न्यायी जनांनी आरोळी केली आणि यहोवाने ती ऐकली, व त्यांच्या सर्व संकटांतून त्यांना मुक्त केले.

१८. जे भग्न हृदयाचे आहेत त्यांच्याजवळ यहोवा असतो, आणि जे पश्चात्तापी आत्म्याचे आहेत त्यांना तो तारतो.

१९. न्यायीचे कष्ट पुष्कळ आहेत, परंतु त्या सर्वांतून यहोवा त्याला सोडवतो;

२०. त्याची सर्व हाडे तो सांभाळतो; त्यातून एकही मोडत नाही.

२१. दुष्टाला दुष्टपण मारून टाकील, न्यायींचा द्वेष करणारे दंड पावतील.

२२. यहोवा आपल्या सेवकांचा जीव खंडून घेतो, आणि जे त्याचा आश्रय धरतात त्यांतला कोणीही दंड पावणार नाही.

# तुमचे संपूर्ण समर्पण तुम्हाला विपुल आशीर्वाद मिळवून देईल!

## YOUR COMPLETE SURRENDER WILL LEAD TO ABUNDANT BLESSINGS!

- सिस्टर एंजेल





आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या मौल्यवान नावाने शुभेच्छा.

माझी खात्री आहे व प्रार्थना सुद्धा आहे की, तुमचा जानेवारी महिना आनंददायी जावो आणि वर्षाची सुरुवात चांगली जावो. अनेकांसाठी, जानेवारी महिना वेगवेगळ्या प्रकारे आव्हानात्मक असू शकतो. २०२६ मध्ये तुमच्या पुढच्या वाटचालीसाठी देवाची शांती, कृपा आणि शक्ती तुम्हाला सतत आधार देत राहो अशी माझी प्रार्थना आहे.

चांगली सुरुवात महत्त्वाची असते, पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे आपण ती कशी पूर्ण करतो. मी प्रार्थना करते की, प्रभू हे वर्ष ख्रिस्त येशूमध्ये फलदायी आणि विजयी करो आणि २०२६ चा शेवट सुरुवातीपेक्षा अधिक गौरवशाली आणि आशीर्वादित होवो.




(...पान २ वर)



## एको ऑफ हिज कॉल

### यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत
सहभागी होण्याची संधी
पाच मिनिटांचा संदेश

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून
रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

* कृपा करुन सबक्राईब करा *

ECHO OF HIS CALL - (Marching towards 60th year)
Estd. 1969



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Dr. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
EX MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.

EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858
95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

## ''यहोवा तुला शिर करील; आणि तो तुला शेपूट करणार नाही''

– अनुवाद २८:१३

प्रभूमधील माझे प्रियजनहो,

आपला प्रभू आणि तारणहार, येशू ख्रिस्ताच्या मौल्यवान नावाने आम्ही तुम्हां सर्वांना अभिवादन करतो!



*सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कुलमधील ख्रिसमसचा कार्यक्रम.*

गेल्या महिन्यात आपल्या सर्व सेवाकार्यांवर देवाने कृपापूर्वक आशीर्वाद दिला आहे. या महिन्यात आपण प्रवेश करीत असताना, इतर शहरांमधील तसेच स्थानीय अशा अनेक सेवाकार्यांची पूर्तता होणे बाकी आहे.

**सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूलमध्ये** पार पडलेल्या ख्रिसमस समारंभात आमचे सचिव डॉ. पी. ई. आर. प्रेमचंद यांनी वचनातून मार्गदर्शन केले. याशिवाय, डिसेंबर महिन्यात आमच्या **नहेम्या बायबल कॉलेजच्या** विद्यार्थ्यांनी आणि आमच्या मंडळीच्या विश्वासणाऱ्यांनी विविध प्रचार कार्ये केली.



*यू ट्यूब मिनिस्ट्री टीम.*

गेल्या वर्षी, आमच्या यूट्यूबच्या सेवेमध्ये उल्लेखनीय वाढ अनुभवली. या संदेशांद्वारे जगभरातील अनेक लोकांना आशीर्वाद मिळाला. या सेवेमध्ये निष्ठेने सहभागी असलेल्या आमच्या कर्मचारीवर्गासाठी आपण नम्रपणे प्रार्थना करावी अशी आम्ही विनंती करतो.

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) YouTube Ministry Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

आमच्या मंडळीमध्ये आम्ही एक अतिरिक्त हिंदी सेवा देखील सुरू केली आहे, विशेषतः हिंदी भाषिक स्थलांतरित कामगारांसाठी. प्रत्येक बुधवारी सायंकाळी ७:०० वाजता हिंदी प्रार्थना सभा घेतल्या जात आहेत. या अर्थपूर्ण आणि अत्यंत आवश्यक अशा सेवेसाठी आपण मनापासून प्रार्थना करावी, अशी आम्ही नम्र विनंती करतो.

आमच्या सेवाकार्यासाठी, तसेच विविध अडचणी आणि आव्हाने असूनही निष्ठेने सेवा करीत असलेल्या आमच्या कार्यालयीन कर्मचारीवर्गाला आपल्या प्रार्थनांमध्ये आवर्जून स्मरणात ठेवा.

आपल्या मौल्यवान प्रार्थना आणि उदार पाठिंब्यामुळे आमची सर्व सेवाकार्ये प्रगती करीत आहेत.

देवाची कृपा तुम्हां सर्वांबरोबर असो.

येशू ख्रिस्तामधील तुमचा सेवक,

**पास्टर एस्. सॅम सेल्व राज,**

E.mail: sam@echoofhiscall.org

(पान १ वरून...)

## सुरुवात चांगली करणारा, पण शेवट चांगला न करणारा एक राजा!

ही सत्यता मला राजा अमस्याहची आठवण करून देते, ज्याने आपला प्रवास ताकदीने सुरू केला, पण त्याचा शेवट दुर्दैवी ठरला. शास्त्रवचन त्याचे कारण स्पष्टपणे उघड करते: **"यहोवाच्या दृष्टीने जे नीट ते तो करीत असे, तरी परिपूर्ण हृदयाने नाही"** – २ इतिहास २५:२.

### अमस्या कोण होता?

- अमस्या हा राजा योआशचा पुत्र होता, जो वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी राजा झाला होता.
- तो यहूदाचा नववा राजा होता.
- त्याची गोष्ट २ राजे १४ आणि २ इतिहास २५ मध्ये नोंदवलेली आहे.

पवित्र शास्त्र आपल्याला काहीतरी अद्भुत सांगते, पण ते अत्यंत गंभीर देखील आहे: **"यहोवाच्या दृष्टीने जे नीट ते तो करीत असे, तरी परिपूर्ण हृदयाने नाही."**



*यहुदाचा नववा राजा.*

- निष्ठावान हृदयाशिवाय देवाची सेवा करण्याचा काय अर्थ होतो?
- देवासमोर जे योग्य आहे ते करणे आणि तरीही पूर्णपणे समर्पण न करणे शक्य आहे का?
- आपले हृदय दुभंगलेले असतानाही आपण बाह्यदृष्ट्या देवाची सेवा करू शकतो का?

अमस्या हा पवित्र शास्त्रातील सर्वात दुःखद राजांपैकी एक आहे – तो दुष्ट होता म्हणून नाही, तर तो जवळजवळ चांगला होता, म्हणजेच अंशतः आज्ञाधारक आणि आणि त्याची निष्ठा अपूर्ण होती.

- त्याने आज्ञापालन केले.
- त्याने चांगले केले.
- त्याने देवाच्या सूचना मान्य केल्या.

तरीही त्याचे हृदय पूर्णपणे समर्पित नव्हते.

ही गोष्ट केवळ अमस्याची नाही, तर आपण देवावर प्रेम करतो. आपण त्याचे अनुसरण करतो. तरीही आपल्या जीवनातील असे काही क्षेत्र असू शकतात जिथे आपण त्याला मर्यादित ठेवले आहे. कदाचित आपण हे करत असू :

- उपासनेला उपस्थित राहणे.
- निष्ठेने सेवा करणे.
- दानधर्म करणे.
- गरजूंना मदत करणे.
- अनेक क्षेत्रात आज्ञापालन करणे.

पण महत्त्वाचा प्रश्न हाच राहतो: देवासमोर आपले हृदय कुठे आहे?

माझे वडील नेहमी म्हणायचे, "अर्धवट आज्ञापालन करणे म्हणजे पूर्णपणे आज्ञांचे उल्लंघन करणे होय."

या वर्षाच्या सुरुवातीला, २०२६ हे वर्ष चांगल्या प्रकारे पार करायचे असेल तर आपण स्वतःला एक प्रश्न नक्की विचारला पाहिजे:

## अत्यंत महत्त्वाची सूचना!




नजीकच्या भविष्यात **एको ऑफ हिज कॉल**च्या पोस्टल डिस्पॅचमध्ये अपरिहार्य व्यत्यय येऊ शकतात. जर आपल्याला कोणताही व्यत्यय न येता **एको ऑफ हिज कॉल** प्राप्त करणे सुरू ठेवायचे असेल तर कृपया आम्हाला आपले नाव, पत्ता, ईमेल आणि व्हॉटस एप नंबर याची माहिती पत्राद्वारे, ईमेल, फोन कॉल किंवा एस एम एस/व्हॉटस एप संदेशाद्वारे तावडतोब पाठवा.

तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला तुमची चांगली सेवा करण्यास मदत होते!

**आमचा पत्ता:**

**एको ऑफ हीज कॉल**
**१०, मोहम्मद अब्दुल्ला २ री गल्ली, चेपॉक, चेन्नई-६००००५, भारत**
**Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail: sam@echoofhiscall.org**

''जे योग्य आहे ते मी निष्ठेने करीत आहे की निष्ठेशिवायच मी काही करीत आहे?''

## अमस्याच्या जीवनाद्वारे मिळणारे धडे!

मला यहूदा आणि इस्राएलच्या राजांच्या जीवनावर मनन करायला आवडते. त्यांच्या कथा आपल्या स्वतःच्या जीवनासाठी शक्तिशाली धडे आणि आरसे आहेत. अमस्याने सुरुवात तर चांगली केली, पण शेवटी काहीतरी चूक झाली. त्या मोबदल्यात त्याला त्याच्या गंभीर परिणामाला सामोरे जावे लागले.







*अमस्याने सुरुवात चांगली केली, पण शेवट चांगला केला नाही.*

## १. वचनबद्धता!

### अमस्याने सुरुवात चांगली केली!

### (२ इतिहास २५:१–१०)

**''यहोवाच्या दृष्टीने जे नीट ते तो करीत असे, तथापि त्याचा बाप दावीद याच्यासारखे नाही; आपला बाप योवाश याने जे केले त्या सर्वांप्रमाणे तो करीत असे''** - २ राजे १४:३.

अमस्याहची सुरुवात चांगली होती आणि त्याने अनेक क्षेत्रांमध्ये आज्ञाधारकता दाखवली.



*दावीदाने जसे केले तसे अमस्याने केले नाही. सर्व गोष्टीत तो आपल्या वडील योवाश यांच्या उदाहरणाप्रमाणे चालला.*

### (अ) देवाच्या वचनाचे पालन करणे आणि न्याय!

जेव्हा अमस्या राज्य करु लागला, तेव्हा त्याने त्याच्या वडिलांचा खून करणाऱ्यांचा चोख न्याय केला. तथापि, त्याने त्यांच्या मुलांना मारले नाही, मात्र देवाच्या नियमाचे पालन केले:

**बापांच्या पापामुळे मुलगे मारले जाऊ नयेत** (अनुवाद २४:१६).

**यासाठी धैर्याची गरज होती. तो सूडाची भीती बाळगू शकला असता, पण त्याने आज्ञापालनाची निवड केली** (२ राजे १४:६). **संभाव्य वारसांना ठार करणाऱ्या राणी अथल्या** (२ राजे ११:१) **हिच्याप्रमाणे नाही, तर अमस्याने देवाच्या नियमाचा सन्मान केला.**

त्याने सुरुवात चांगली केली.

### (ब) वैयक्तिक नुकसान असूनही आज्ञापालन!

अमस्याहने इस्राएलमधून १,००,००० सैनिक भाड्याने घेतले, जी एक खर्चिक गुंतवणूक ठरली. जेव्हा संदेष्ट्याने त्याला त्यांचा उपयोग करु नकोस असे सांगितले, तेव्हा अमस्याने मनापासून एक प्रश्न विचारला: ''...... **मी इस्राएलाच्या सैन्याला दिलेल्या शंभर किक्करांविषयी आम्ही काय करावे?**........'' - २ इतिहास २५:९.



*मी इस्राएलाच्या सैन्याला दिलेल्या शंभर किक्करांविषयी काय करावे?*

संदेष्ट्याने उत्तर दिले: **''यहोवा त्यापेक्षा अधिक तुला द्यायला समर्थ आहे''** (२ इतिहास २५:९).

आज्ञाधारकतेची त्याला मोठी किंमत मोजावी लागली, तरी अमस्याने त्याचे ऐकले. त्याने सैनिकांना घरी पाठवले आणि देवावर विश्वास ठेवला.

आज्ञापालनाची किंमत नेहमीच मोजावी लागते, पण आज्ञा उल्लंघनाची किंमत त्याहून कितीतरी अधिक असते.

या टप्प्यावर, अमस्या एक धार्मिक राजा असल्याचे दिसून आले आणि देवाने त्याला सन्मानित केले.

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS

ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ फेब्रुवारी, २०२६ पासून ते १८ मार्च, २०२६

ओझी वाहणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

**१९ फेब्रुवारी -** आमच्या **एको ऑफ हिज कॉल** यूट्यूब चॅनेलचे अखंड प्रसारण करण्यात मदत करणारी एक विलक्षण मीडिया टीम यासाठी देवाची स्तुती करा.

**२० फेब्रुवारी -** आमच्या सहभागीदारांच्या नैतिक आणि आर्थिक पाठिंब्यामुळे देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२१ फेब्रुवारी -** आमचे २०२६ चे मासिक कॅलेंडर आणि अभिवचन पत्रिका यांची छपाई व वितरण करण्याचे कार्य पूर्ण करण्यासाठी देवाने आम्हाला कृपा पुरवली यासाठी देवाची स्तुती करा.

**२२ फेब्रुवारी -** **नहेम्या बायबल कॉलेज** आणि **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूलमधील** आमच्या विशेष ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या कार्यक्रमांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२३ फेब्रुवारी -** आमच्या सर्व मंडळीच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी तरुणांना देवाने उत्साहरुपी आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२४ फेब्रुवारी -** आमच्या **मीडिया मिनिस्ट्रीला** तसेच **एको ऑफ हिज कॉल** या यूट्यूब चॅनेलला देवाने आशीर्वादित केले व ज्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाही अशा बहुभाषिक लोकांपर्यंत पोहोचण्याची कृपा देवाने पुरवली यासाठी देवाची स्तुती करा.

**२५ फेब्रुवारी -** आमच्या प्रार्थनेतील सहभागीदार, सदस्यता घेणारे सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार, आणि महान सेवाकार्याचे सहभागीदार आणि त्या सर्वांचे कुटुंबीय यांना देवाने त्याची कृपा पुरवली यासाठी देवाची स्तुती करा.

**२६ फेब्रुवारी -** आमच्या मंडळीच्या सेवेला अधिक संघटित पद्धतीने काम करण्यासाठी दिवसाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२७ फेब्रुवारी -** आमचे ज्येष्ठ पाळक एस. सॅम सेल्वा राज आणि कुटुंबीय यांचे सर्व वाईट शक्तींपासून देवाने संरक्षण केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२८ फेब्रुवारी -** आमच्या **एको ऑफ हिज कॉल** या सेवेमधील कर्मचारीवर्ग आणि त्यांच्या कुटुंबीयांना उत्तम आरोग्य व दैवी संरक्षणाने देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**०१ मार्च -** आमच्या **बायबल कॉरस्पॉन्डन्स कोर्सची** आणि **थिऑलॉजिकल कॉरस्पॉन्डन्स कोर्स** या अभ्यासक्रमांची देव वाढ करत आहे यासाठी देवाची स्तुती करा.

**०२ मार्च -** आमची प्रमुख मंडळी आणि इतर आमच्या मंडळीच्या शाखांच्या रविवारच्या उपासनामध्ये देवाने त्याच्या वचनाचे सामर्थ्य प्रकट केले यासाठी देवाची स्तुती करा.

**०३ मार्च -** आमच्या प्रिंटिंग प्रेसमध्ये १६ भाषांमध्ये आमचे मासिक छापून प्रकाशित करण्यास आणि ते मिशन क्षेत्रात पाठवण्यास देव आम्हांस सक्षम करतो यासाठी देवाची स्तुती करा.

**०४ मार्च -** आमच्या **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूलचे** मुख्याध्यापक, शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

**०५ मार्च -** ख्रिस्ती प्रचारकांनी देवाचे वचन कोणतीही भेसळ न करता शुद्ध व परिपूर्ण रीतीने प्रचार करावे यासाठी प्रार्थना करा.

**०६ मार्च -** २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी आमच्या निवासी आणि संध्याकाळच्या **नहेम्या बायबल महाविद्यालयांसाठी** पात्र विद्यार्थ्यांचा प्रवेश व्हावा यासाठी कृपया प्रार्थना करा.

**०७ मार्च -** आमच्या **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूलमध्ये** २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी कृपया प्रार्थना करा.

**०८ मार्च -** राष्ट्रांमधील मुले आणि तरुणांनी येशू ख्रिस्ताला त्यांचा वैयक्तिक तारणहार म्हणून स्वीकारावे यासाठी प्रार्थना करा.

**०९ मार्च -** आमचे सहाय्यक संपादक आणि त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी प्रार्थना करा.

**१० मार्च -** वृद्धाश्रमातल्या वृद्धांच्या आरोग्य आणि शांती यासाठी प्रार्थना करा.

**११ मार्च -** आमच्या **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूलच्या** दहावीच्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या अंतिम परीक्षेत उत्कृष्ट निकाल लागावा यासाठी प्रार्थना करा.

**१२ मार्च -** आमच्या **एको ऑफ हिज कॉलच्या** यूट्यूब शॉर्ट्सद्वारे अजूनही पोहोचू न शकलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी देवाने त्याची कृपा पुरवावी यासाठी प्रार्थना करा.

**१३ मार्च -** आमच्या **नहेम्या बायबल कॉलेजच्या** विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या पदवी संपादन करावी यासाठी प्रार्थना करा.

**१४ मार्च -** आमच्या प्रार्थनेतील सहभागीदार, सदस्यता घेणारे सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार, आणि महान सेवाकार्याचे सहभागीदार आणि त्या सर्वांचे कुटुंबीय यांच्या उन्नतीसाठी देवाने कृपा पुरवावी यासाठी प्रार्थना करा.

**१५ मार्च -** युद्धापासून जगातील देशांना दैवी संरक्षण लाभावे यासाठी प्रार्थना करा.

**१६ मार्च -** जगभरातील देवाची सेवा करणाऱ्या सेवकांना देवाचे संरक्षण लाभावे यासाठी प्रार्थना करा.

**१७ मार्च -** सर्व देशांवर आणि त्यांच्या आर्थिक विकासावर त्याचा आशीर्वादाचा हात असावा यासाठी प्रार्थना करा.

**१८ मार्च -** आमचे ज्येष्ठ पाळक एस. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे सर्व प्रकारच्या वाईट शक्तींपासून संरक्षण व्हावे यासाठी प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)



*अमस्याने सैनिकांना घरी पाठवले.*

तरीही, पवित्र शास्त्र आपल्याला इशारा देते: **जे नीट ते त्याने केले... पण परिपूर्ण हृदयाने नाही.**

## (क) पूर्ण समर्पणाशिवाय वचनबद्धता!

अमस्या दुष्ट किंवा बंडखोर नव्हता. तो त्याचे धर्मनिष्ठ वडील योवाश याचे अनुकरण केले; मात्र दावीदासारखा तो पूर्ण मनाने देवाची सेवा करणारा नव्हता.



*शालेम म्हणजे पूर्णपणे समर्पण.*

त्याने सुरुवात चांगली केली, पण देवाला चांगली सुरुवात करणारे नाही, तर चांगल्या प्रकारे शेवट करणारे लोक हवे आहेत. जे नीट ते अमस्याने केले... पण परिपूर्ण हृदयाने नाही.

हिब्रू शब्द शालेम याचा अर्थ संपूर्ण, पूर्ण, अविभाजित, पूर्णपणे शरण गेलेला असा होतो.


अपूर्ण आज्ञापालन हीच अमस्याची समस्या होती. तो वरवर पाहता देवाचे अनुसरण करीत होता, पण आपल्या हृदयातील काही भाग त्याने देवासाठी अस्पर्शित ठेवले.

प्रिय बंधू आणि भगिनींनो, पुढील गोष्टी करणे शक्य आहे:

- दशमांश देणे.
- प्रामाणिकपणे सेवा करणे.
- नैतिकतेने जगणे.

तरीही, अहंकार, क्षमा न करणे, वासनाधीन, निंदा करणे, गुप्त पापे किंवा स्व-इच्छाधीन जीवन यांना ते चिकटून राहतात.

आंतरिक समर्पणाशिवाय असलेले बाह्य आज्ञापालन आत्मिक रिक्तपणाकडे घेऊन जाते. एखाद्याने खोलवर मुळे



*एखाद्याने खोलवर मुळे रोवलेली असावीत आणि वरच्या दिशेने फळ धारण करावे.*

रोवलेली असावीत आणि वरच्या दिशेने फळे देणारे असावे.

## २. तडजोड करणे!

**जे त्याने होऊ दिले, त्यानेच त्याचा घात केला!**

**२ इतिहास २५: ११-१६**

**"उंचस्थाने काढली नव्हती;.........."** - २ राजे १४:४.

अमस्याने जे नष्ट करायला हवे होते ते तो सहन करीत राहिला.

तडजोड ही नेहमी लहान गोष्टीपासून सुरू होते; पण आज आपण जे सहन करतो ते उद्या आपल्यावर प्रभुत्व गाजवील.

## (अ) विजयानंतरचा अहंकार!



*अमस्याने त्यांच्या मूर्त्या आपल्याबरोबर घेऊन आला आणि त्याने त्यांना नमन केले.*

(पान ८ वर)


नहेम्या बायबल कॉलेजेस
चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नाई
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
प्रवेशा करिता त्वरा करा !
ईश्वरविद्या डिप्लोमा & Bachelor of Theology
माध्यम : तमिळ (अर्धवेळ) हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५६ वर्षांपासून मान्यता प्राप्त
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. शाखा चर्च : संतोषपुरम, बालाजी नगर आणि वेलाचेरी
७. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
८. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
९. महासभा
१०. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
११. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
१२. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१३. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१४. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१५. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१६. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१७. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१८. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**२१. तमिळ आणि इंग्रजी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२२. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२३. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२४. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२५. शिष्यत्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२६. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२७. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२८. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२९. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
३०. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३१. उपवास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३२. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३३. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्री १० वाजता (फोन द्वारा)
३४. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३५. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल

### टपाल द्वारे धर्म शास्त्राचे अभ्यासक्रम

केवळ भारतातील उमेदवारां करीता

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभुत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवार्तिक, ख्रिस्ती पुढारी आणि अशिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. **'सर्टफिकेट इन मिनिस्ट्री'** प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

*अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -*

अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् अॅप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | **: ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | **: 1023 2923 805** |
| **Bank Name** | **: STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | **: TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | **: SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | **: SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

# PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## प्रभू ज्याने माझ्या नीच दशेकडे लक्ष दिले!

**ज्याने आमच्या नीच दशेत आमची आठवण केली, कारण त्याची प्रेमदया सर्वकाळ आहे**
**– स्तोत्र १३६:२३**

माझ्या सेवेच्या सुरुवातीच्या काळात, मी माझ्या एका मित्राच्या कुटुंबासोबत परदेशात काही दिवस राहिलो होतो. त्यांनी माझ्या सर्व मूलभूत गरजा पूर्ण केल्या आणि तिथे माझा मुक्काम आरामदायी केला.

एका संध्याकाळी, मित्र जो माझा पाहुणचार करीत होता, तो माझ्या खोलीत आला आणि म्हणाला, ''मला असं वाटतंय की तू देवाकडे एखाद्या खास गरजेसाठी प्रार्थना करीत आहेस. मला त्याबद्दल कळू शकेल का?''

त्याबद्दल मला समजावून सांगशील का? मी उत्तर दिले, ''आम्ही आमचे **एको ऑफ हिज कॉल** हे मासिक इतर छापखान्यांमध्ये छापत आलो आहोत. आम्हाला ते वेळेवर प्रकाशित करणे खूप कठीण जात असल्याने, मी ऑफसेट प्रिंटिंग मशीनसाठी मोठ्या ओझ्याने प्रार्थना करीत आहे.'' त्याने सांगितले की, तो सुद्धा त्या गरजेसाठी प्रार्थना करील.

दुसऱ्या दिवशी, सेवेसाठी मी घराबाहेर जात असताना, माझा मित्र आणि त्याची पत्नी माझ्याकडे आले. त्यांनी मला कागदपत्रे दाखवली, ज्यामध्ये बँकेला दिलेला अर्ज आणि जाहीरनामा होता. त्यामध्ये त्यांनी मोठी रक्कम मिळवण्यासाठी आपले घर तारण ठेवण्याचा निर्णय घेतला होता, आणि त्या रकमेतील निधीतून **एको ऑफ हिज कॉल** या सेवाकार्यासाठी आवश्यक असलेली मशीन खरेदी करण्याची त्यांची इच्छा होती.

मला धक्का बसला आणि माझे मन अस्वस्थ झाले, आणि मी त्यांना ठामपणे म्हणालो, ''तुम्ही बँकेकडून कर्ज म्हणून जे पैसे घेणार आहात ते मी स्वीकारणार नाही.''

त्या कुटुंबाला माझ्या या वागण्याने आश्चर्य वाटले. त्यांनी मला ''याला जगात कसे जगायचे ते कळत नाही'' असा शिक्का मारला. ते मला ही ऑफर स्वीकारण्यासाठी सतत समजावून सांगत राहिले. पण मी माझ्या निर्णयावर ठाम राहिलो आणि प्रार्थना करीत राहिलो.

काही दिवसांनी मी भारतात परतलो. प्रभूने माझ्या गरीब भारतीय मित्रांच्या हृदयांना प्रेरणा दिली, आणि त्यांनी वेळोवेळी दिलेल्या अर्पणांमुळे मला एक चांगली ऑफसेट मशीन खरेदी करता आली.

**मी अनुभवू शकलो आणि चाखून पाहू शकलो की, प्रभू चांगला आहे** (स्तोत्र ३४:८). नीतिसूत्रे २८:२० नुसार, प्रभूची कृपा मला समर्थपणे धरून ठेवते. ''**विश्वासू मनुष्य उदंड आशीर्वाद पावेल.**''

जरी **एको ऑफ हिज कॉल** या सेवाकार्याला नियमित व ठराविक उत्पन्न नसले, तरी आमच्या त्याच्यावरच्या विश्वासाद्वारे प्रभू आमच्या सर्व गरजा पूर्ण करतो. सर्व महिमा व स्तुती देवालाच असो, आमेन.

************

(पान ६ वरून)

**अदोम्यांचा पराभव केल्यानंतर, अमस्याने त्यांच्या मूर्त्या आपल्याबरोबर घेऊन आला आणि त्याने त्यांना नमन केले** (२ इतिहास २५:१४).

याचा विचार करा: देवाने त्याला विजय दिला

- अहंकाराने प्रवेश केला.
- सद्सद्विवेकबुद्धी नियून गेली.
- तडजोड पुढे आली.

त्याने पराभूत लोकांच्या देवांना नमन केले. पाप हे किती फसवे असू शकते.

### (ब) सुधारणा करण्यास नाकारणे!

आधी, अमस्याने सुधारणा स्वीकारली होती, पण आता अहंकाराने भरून त्याने ती नाकारली.

''.....................**ज्या देवांना आपले स्वत:चे लोक तुझ्या हातातून सोडवता आले नाहीत त्यांच्या नादी तू का लागलास?''** – २ इतिहास २५:१५

अमस्याने अहंकाराने उत्तर दिले:

''**आम्ही तुला राजाचा मंत्री केले आहे काय?**'' (२ इतिहास २५:१६)

त्याच्या वृत्तीत किती मोठा बदल झाला होता! ज्या क्षणी आपण देवाच्या सुधारणा ऐकणे थांबवतो, त्या क्षणापासूनच आपली विनाशाकडे वाटचाल सुरू होते.

जेव्हा आज्ञापालन करणे त्याच्या सोयीचे होते तेव्हा त्याने ते पाळले; पण जेव्हा आज्ञापालन असहज करणारे झाले, तेव्हा त्याने ते नाकारले. आपला प्रथम नाश पापामुळे होत नाही; तर देवाची सुधारणा स्वीकारण्यास नकार देण्यामुळे होतो. या वर्षासाठी माझी प्रार्थना अशी आहे की, देव आपल्याला प्रत्येक पावलावर त्याचा आवाज ऐकण्यास मदत करो आणि आपण

(पान ८ वरुन)

त्याच्या मार्गांत विश्वासू रीतीने चालत राहो.

**"आणि जेव्हा तुम्ही उजवीकडे फिराल, आणि जेव्हा तुम्ही डावीकडे फिराल तेव्हा तुझे कान तुझ्यामागे वाणी ऐकतील, ती म्हणेल की, हाच मार्ग आहे यात तुम्ही चाला"** - यशया ३०:२१.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आपण पूर्णपणे शरण जायला शिकले पाहिजे आणि त्या मार्गदर्शक आवाजाचे पालन केले पाहिजे.

## (क) तडजोडीमुळे अहंकार, बंडखोरी आणि आंधळेपणा आला!

तडजोड ही एक धोकादायक प्रतिक्रियेची साखळी निर्माण करते:

- अभिमान.
- मूर्तिपूजा.
- सल्ला नाकारणे.
- स्वतःवर अतिविश्वास.
- चेतावण्यांकडे दुर्लक्ष करणे.
- मूर्खपणाचे निर्णय.

समर्पणाशिवाय असलेली वचनबद्धता नेहमीच तडजोडीकडे नेते.

## ३. परिणाम!

ज्याचे तुम्ही समर्पण करीत नाही तोच तुमचा नाश करील!

(२ इतिहास २५:१७-२८)

## (अ) देवाने परवानगी न दिलेली लढाई!

आपल्या यशाचा अभिमान बाळगून, अमस्याने इस्राएलच्या राजाला युद्धाचे आव्हान दिले. मात्र देव त्याच्यासोबत नव्हता.

देवाशिवाय स्वतःचा आत्मविश्वास घातक आहे. त्याने हे गृहित धरले की, यश हे देवाच्या मान्यतेचे प्रमाण आहे. इस्राएलाच्या राजाने त्याला एका दाखल्याद्वारे सावध करून सांगितले, पण अमस्याने त्याकडे दुर्लक्ष केले. जेव्हा एखाद्याचे हृदय देवास समर्पित नसते, तेव्हा तो सर्वांचे ऐकणे थांबवतो, अगदी देव ज्याला पाठवतो त्याच्याही शब्दांकडे तो दुर्लक्ष करतो.

## (ब) सुज्ञ चेतावण्यांकडे दुर्लक्ष करणे!

अगदी शत्रूनेही अमस्याच्या अहंकाराला ताडले: ........ **"फुशारकी मिरवायला तुझ्या हृदयाने तुला उन्मत्त केले आहे. आता तू घरी राहा,......"** (२ इतिहास २५:१९).

जेव्हा 'अहंकार' आपल्याला सत्यापासून अंध बनवतो, तेव्हा आपण सामान्य बुद्धीकचेही ऐकणे थांबवतो. प्रभू आपल्याला या मूर्खपणापासून दूर ठेवो.

## (क) अमस्याचा संपूर्ण नाश!

तडजोडीमुळे :



*यरुशलेमची भिंत पाडून टाकण्यात आली.*

त्याच्या सैन्याचा पराभव झाला

- येरुशलेमची भिंत तोडली गेली.
- देवाचे मंदिर लुटले गेले
- त्याला बंदी बनवले गेले
- त्याचे जीवन लाज आणि कोटकारस्थानात संपले.

जो माणूस सुरुवातीला वचनबद्धतेमध्ये पुढे चालला, तो अखेरीस पूर्णपणे मोडला गेला.

का?

कारण जे नीट ते त्याने केले... पण परिपूर्ण हृदयाने नाही.

त्याचे हळूहळू पतन होते - लहान तडजोडींमुळे.

समर्पण ----- तडजोड ----- परिणाम

## अंतिम आवाहनः पूर्ण समर्पणाची निवड करा!

प्रिय मित्रांनो, देव परिपूर्णतेची मागणी करत नाही-पण तो संपूर्ण मनाने समर्पण करण्यासाठी आपल्याला बोलावत आहे.

करत नाही-पण तो संपूर्ण मनाने समर्पण करण्यासाठी आपल्याला बोलावत आहे.

- वचनबद्धता चांगली आहे
- अंशतः समर्पण धोकादायक आहे
- तडजोड वाढेल
- त्याचे परिणाम पुढे येतील.

प्रेम आणि दयेमुळे, देव आपल्याला पाचारण करतो:

"जे तुम्हाला वाचवू शकत नाही त्याच्याकडे का वळता? परत या." पूर्णपणे शरण जा.

येशूने क्रूसावर आपले जीवन अर्पण केले, जेणेकरून तुम्ही आणि मी पूर्णपणे समर्पित जीवन जगू शकू.

"परत या. पूर्णपणे समर्पित व्हा."

देवाकडे परत या - तो दोन्ही हात पसरून तुमची वाट पाहत आहे. अमस्या ज्या निसरड्या मार्गाने गेला, त्या मार्गावर तुम्ही जाऊ नये. याच कारणासाठी ख्रिस्त या जगात आला आणि कालवरीच्या क्रूसावर आपले जीवन अर्पण केले; तुम्हाला आणि मला मुक्त करण्यासाठी.

## *चला, तर आपण आत्मपरीक्षण करूया!*

- आपण काही क्षेत्रांत वचनबद्ध आहोत, पण इतर काही क्षेत्रांत तडजोड करीत आहोत का?
- आपण कोणती उंच ठिकाणे अजून पाडलेली नाहीत-कटुता, गुप्त सवयी, व्यसनाधीनता?
- आपल्या हृदयाचा कोणता भाग अजून देवाशी पूर्णपणे निष्ठावान नाही?

चला, प्रार्थना करूया आणि प्रभूच्या दृष्टीने योग्य ते करीत विश्वासपूर्ण हृदयाने २०२६ हे वर्ष पार करण्यासाठी प्रयत्न करूया.

*******

## सूचना

कृपया आमचे मोबाईल क्रमांक (+९१) ९८४१० ७१८५८, (+९१) ९८४१२७१८५८ (मुख्य क्रमांक) आपल्या मोबाईल फोनमध्ये जतन करून ठेवा.

**- संपादक**

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

## OUR QR CODE:

ECHO OF HIS CALL

Scan to pay with any UPI app

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य, गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-   आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26
WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS Patrika Channel"
on 12th FEBRUARY 2026.
If un-delivered please return to:
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

*JESUS LOVES YOU!*

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**